# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- १०१-२२** **दिनांक :- ११/०४/२०२२**

## दुचाकी वाहन व रिक्षा चोरी करणाऱ्या आरोपीतांना गजाआड करण्यात पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दि.०३/०४/२०२२ रोजी ०४.३० वा. ते ०७.३० वा.चे दरम्यान ॲक्सीस ए.टी.एम.चे बाजुला, नवजिवन, धानिवरोड, नालासोपारा(पु.), ता.वसई, जि.पालघर येथे फिर्यादी यांनी त्यांची होंडा कंपनीची ॲक्टीव्हा मोटार सायकल क्रं.एम.एच.४८/बी.एन.४६१७ ही उभी करुन ठेवलेली असतांना, कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली होती. सदरबाबत फिर्यादी नामे श्री.मोहम्मद कलिममुल्ला अन्सारी, रा.शांतीनगर, नालासोपारा(पु.), ता.वसई, यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीविरुध्द पेल्हार पो.स्टे. गु.रजि.नं. I ३०३/२०२२ भा.द.वि.स. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. त्यानंतर दि. ०७/०४/२०२२ रोजी १८.०० वा. ते १८.३० वा. दरम्यान बजरंगबली हॉटेल समोर, वसई फाटा, वसई (पु.), ता.वसई, जि.पालघर येथे फिर्यादी यांनी त्यांची होंडा कंपनीची युनिकॉर्न कंपनीची मोटार सायकल क्रं.एम.एच.४८/बी.जे.७८९१ ही उभी करुन ठेवलेली असतांना, कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरी करुन नेली होती. सदरबाबत फिर्यादी नामे श्री. तोफीक खान, रा.जयनगर, वालीव, वसई(पु.) यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीविरुध्द पेल्हार पो.स्टे. गु.रजि.नं. I ३१४/२०२२ भा.दं.वि.सं.कलम-३७९ प्रमाणे दि.०८/०४/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

वर नमुद गुन्हयाचे अनुषंगाने पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ तांत्रिक माहिती व गुप्त बातमीदार यांचेमार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे आरोपी नामे १) अमान पप्पु शेख, रा.नालासोपरा(प.), ता.वसई, २) अब्दुल रहिम अब्दुल रफिक मनिहार, रा.नालासोपारा(पु.), ता.वसई, ३) अभिषेक राजेश सिंग, ४) अमन आरिफ खान, दोन्ही रा.वसई गाव, वसई रोड(प.),ता.वसई, यांना वर नमुद गुन्हयांत अटक करुन त्यांचेकडून चोरीस गेलेल्या ०५ मोटार सायकल व एक रिक्षा असा एकुण २,५०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

नमुद आरोपीतांकडून खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.रजि.नं व कलम |
|---|---|---|
| १. | पेल्हार | ९५/२०२२, भा.दं.वि.सं. कलम- ३७९ प्रमाणे |
| २. | पेल्हार | ३०३/२०२२, भा.दं.वि.सं. कलम-३७९, ३४ प्रमाणे |
| ३. | पेल्हार | ३१४/२०२२, भा.दं.वि.सं. कलम- ३७९ ३४ प्रमाणे |
| ४. | विरार | २९९/२०२२, भा.दं.वि.सं. कलम- ३७९, ३४ प्रमाणे |
| ५. | विरार | ३६५/२०२२, भा.दं.वि.सं. कलम- ३७९, ३४ प्रमाणे |
| ६. | वालीव | ३१७/२०२२, भा.दं.वि.सं. कलम-३७९, ३४ प्रमाणे |

सदरची कामगिरी श्री.प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री.रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री.विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री.महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोउपनि/सुनिल पाटील, पोहवा/योगेश देशमुख, तुकाराम माने, तानाजी चव्हाण, पोना/प्रताप पाचुंदे, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड, रोशन पुरकर यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

-----------ooooo---------